दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.२२ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएचएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ९२ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 22 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 92 | Pages 4 | Rate 4 Rs

### अपात्र लाभार्थी योजनेबाहेर ठेवण्यात येतील

**मुंबई–** अंगणवाडी सेविका, बाल विकास प्रकल्प अधिकारी (उअ्झज), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि महिला व बाल विकास आयुक्त हे सर्व मिळून या कागदपत्रांची पडताळणी करून अंतिम शिफारस शासनाकडे पाठवतील. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ करण्यात आल्याचे विभागाने सांगितले आहे. जेणेकरून खऱ्या गरजू महिलांची मदत होईल आणि अपात्र लाभार्थी योजनेबाहेर ठेवण्यात येतील. शासनाच्या या निर्णयामुळे विधवा, एकल माता, निराधार महिला आणि पालक गमावलेल्या महिलांना आर्थिक सहाय्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक लाभार्थींनी या निर्णयाचे स्वागत केले असून यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनातील आर्थिक अनिश्चितता काही प्रमाणात कमी होणार आहे.

# एकनाथ शिंदे भाजपवर नाराज नाहीत एनडीएचे नेते म्हणून शहांची भेट

## नाराजीच्या बातम्या केवळ संभ्रम निर्माण करणाऱ्या–चंद्रशेखर बावनकुळे

### पक्ष प्रवेशावर शिंदे नाराज नाही

**चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आपल्याला पक्षाकडून तिकीट मिळणार नाही हे लक्षात आले की स्थानिक पदाधिकारी पक्ष बदलतात. एखादा व्यक्ती जर पक्षात येण्यासाठी तयार असेल तर प्रत्येकाला आपला पक्ष वाढवावा लागतो. यामुळे काही पक्ष प्रवेश होत राहतात, त्यातून एकनाथ शिंदे नाराज होतील आणि अमित शहा यांची भेट घेतली यामध्ये काही तथ्य नाही.पक्षप्रवेशामध्ये देवेंद्र फडणवीस आणि माझ्यासोबत ते समन्वय साधतात. एवढ्या कारणासाठी ते अमित शहा यांच्याकडे गेले नाही.एकनाथ शिंदे यांनी एनडीएचे नेते म्हणून राज्याच्या विकासासाठी अमित शहा यांची भेट घेतली आहे.**

**नागपूर (वृत्तसंस्था)**–नगरविकास खाते आणि केंद्र सरकारच्या समन्वयाच्या काही विषयावर एनडीएचे नेते म्हणून एकनाथ शिंदे यांनी अमित शहा यांची भेट घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना एनडीएचे नेते काही काळानंतर भेटत राहतात ही आमची परंपरा आहे. एकनाथ शिंदे भाजपवर नाराज आहे या बातम्या संभ्रम निर्माण करणाऱ्या आहेत. शिंदेंनी भेट घेतली ती स्थानिक स्वराज्य संस्थेत युतीला बहुमत मिळावे यासाठी होती, ते भाजपवर नाराज नाहीत, असे भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ३१ जानेवारीपर्यंत सर्व निवडणुका घ्यायचा जो सुप्रीम कोर्टाचा निकाल आला आहे. निवडणूक आयोगाने २७ टक्के ओबीसी आणि सर्व मिळून आरक्षण दिले आहे. ओबीसींचे २७ टक्के आरक्षण कायम राहिले पाहिजे ही मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह एनडीएची भूमिका आहे.



### तिन्ही पक्षाचे पदाधिकारी एकडे–तिकडे

**चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुतीच्या समन्वय समितीमध्ये देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे, यांच्यासह मी सुद्धा आहे. त्या समितीमध्ये हे ठरले आहे की मित्रपक्षामधील कोणाचाही पक्ष प्रवेश करायचा नाही. पण जेव्हा स्थानिक पातळीवर तिकीट मिळत नाही तेव्हा पदाधिकाऱ्यांना मित्रपक्षांत जात तिकीट मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक पक्षात असे झाले आहे. तिन्ही पक्षांचे लोक एकडे–तिकडे गेले आहेत, त्यामुळे महायुतीमध्ये नाराजी नाही.**

## चोरीला गेलेले २२ हजार अखेर परत; फिर्यादीच्या चेहऱ्यावर समाधान

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

माजलगाव शहरातील बस स्थानकात घडलेल्या चोरीतील २२ हजार रुपयांची रोकड सहा महिन्यांनंतर अखेर मालकाच्या हाती परत आली असून, फिर्यादी धनंजय किसनराव ताटे यांनी पोलिसांप्रती मनापासून कृतज्ञता व्यक्त केली आहे.

घटना २ जून २०२५ रोजीची. उमरखेड–ते–अहिल्यानगर बसमध्ये चढत असताना ताटे यांच्या खिशातील २२,००० रुपये तीन अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. याप्रकरणी माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. २०५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०३(२), ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता.पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोह. १०६८ कृष्णा जायभाये यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. सीसीटीव्ही फुटेजचा योग्य वापर, तांत्रिक तपास आणि कौशल्यपूर्ण चौकशीतून तीन आरोपी – दत्ता ज्ञानेश्वर



गुंजाळ, चंदू लक्ष्मण गायकवाड आणि सचिन विश्वनाथ साठे (सर्व रा. बीड) – यांना निष्पन्न करण्यात पोलिसांना यश मिळाले.

तपासात आरोपींकडून चोरी केलेली २२,००० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. ही रक्कम आज (दि. २१ नोव्हेंबर २०२५) पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते फिर्यादी धनंजय ताटे यांना परत करण्यात आली. पैसे परत मिळताच ताटे यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते. त्यांनी पोलिस दलाचे आभार मानले.

या कार्यवाहीत पोलीस अधीक्षक नवनित कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेणीपोउपनि तुळशीराम जगताप, पोह. कृष्णा जायभाये, पोह. किशोर जाधव आणि पोह. बाळकृष्ण जायभाये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे आणि प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या नेतृत्वाखाली

## सौ.जयश्री रवींद्र गीते मुंडे यांची परळी नगरपालिकेवर बिनविरोध निवड!

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगरपालिका निवडणूक २०२५ महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ. जयश्री रवींद्र गीते मुंडे यांची माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार धनंजय मुंडे साहेब, भाजपाच्या मंत्री पंकजाताई मुंडे व शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक ११ ब मधून परळी नगरपालिकेवर बिनविरोध निवड झाली.परळी नगरपालिका निवडणूक २०२५ चा आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिनांक होता. यामध्ये प्रभाग क्रमांक ११ ब मधून महायुतीच्या अधिकृत उमेदवार श्रीमती जयश्री रवींद्र (पापा सेठ) गीते – मुंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता त्या विरोधात असलेल्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने त्यांची परळी नगरपालिकेवर बिनविरोध निवड



झाली. या निवडीचा जल्लोष कार्यकर्त्यांनी ढोल ताशा व फटाक्याच्या आतिषबाजीने साजरा केला. त्यांच्या विजयाने महायुतीचे पारडे निवडणुकीत जड झाले आहे. निवड झाल्यानंतर नवनिर्वाचित उमेदवारासह शिवसेना नेते प्रा. टी .पी. मुंडे सर, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख बापूसाहेब मोरे,जिल्हा प्रमुख सचिन मुळूक, तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने, माळहिवरा गोपाळपूर ग्रामपंचायतचे सरपंच आत्माराम कराड, ओमप्रकाश सारडा,भीमराव मुंडे, राजाभैया पांडे, रामरावजी गित्ते, रफिक भाई कुरेशी,सूर्यकांत मुंडे,विनायक गडदे, छत्रपती कावळे,प्रा.विजय मुंडे,प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे,रवींद्र पापा गित्ते, आदींनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. दरम्यान निवड झाल्यानंतर परळीतील छत्रपती शिवाजी महाराज तसेच रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी रघुनाथ डोळस, मुक्तार भाई, चाँद भाई, भोपल्याचे सरपंच बाळासाहेब मुंडे, शाम गडेकर,भागवत मुंडे, शिवा बडे,शिवा चिखले, अर्जुन बुंदिले, श्रीमंत कांगणे, माजेद भाई ,प्रवीण घाडगे, पांडुरंग निकते आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळीत काँग्रेस–वंचित आघाडीच्या प्रचाराचा आज होणार भव्य शुभारंभ


### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते प्रचाराचा होणार शुभारंभ

### या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमास उपस्थित राहावे–काँग्रेसचे अध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी नगरपरिषद निवडणुकीची वातावरणनिर्मिती जोर धरत असताना, काँग्रेस–वंचित बहुजन आघाडी आज आपल्या प्रचार मोहिमेचा दणदणीत शुभारंभ करणार आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते हा प्रचार आज सकाळी ११ वाजता मोंढा मार्केट येथे सुरू होणार आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या उपस्थितीमुळे हा कार्यक्रम परळीत मोठे राजकीय आकर्षण ठरणार आहे. तरी परळी शहरातील मतदार बांधवांनी व नागरिकांनी मोठी संख्येने उपस्थित राहावे– काँग्रेसचे अध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदांची निवडणूक लढविण्यात येत आहे. या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ शनिवार,दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. शहरातील मोंढा मार्केट येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडण्यात येईल. माजी राज्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या प्रचार शुभारंभ कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारणी सदस्य अमित भुईगळ ,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेशभाऊ कांबळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई व वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रमास काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे



तसेच नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. प्रचार शुभारंभासाठी शहरातील कार्यकर्त्यांत आणि समर्थकांत मोठा उत्साह आहे.प्रचाराच्या उद्घाटनावेळी काँग्रेस–वंचित आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदांच्या सर्व उमेदवारांचा परिचय करून देण्यात येणार आहे. परळीतील आगामी निवडणुकीच्या राजकीय समीकरणांना वेगळेच वजन आणि दिशादर्शन मिळणार असल्याचे बोलले जात आहे. विजयाच्या तयारीत काँग्रेस–वंचित आघाडी परळी नगरपरिषदेत सत्ता स्थापन करण्यासाठी आघाडीने नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी संयुक्त लढत जाहीर केली आहे. तरुणाईपासून ज्येष्ठ मतदारांपर्यंत या आघाडीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.परळी शहरातील सर्व नागरिकांनी आणि सुजाण मतदारांनी या भव्य प्रचार शुभारंभाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आघाडीच्या विजयावर शिक्कामोर्तब करावे, असे आवाहन काँग्रेसचे अध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे. परळीत निवडणूक रंगत आणखी वाढवणार असून, काँग्रेस–वंचित बहुजन आघाडीच्या शक्तिप्रदर्शनाचा निर्णायक टप्पा ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी या प्रचार शुभारंभाच्या होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

## घराचे कुलूप तोडून १ लाख ६६ हजार रुपयाचे दागिने लंपास, खाडे वाडी येथे दिवसा ढवळ्या झाली चोरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील खाडेवाडी येथील खाडे कुटुंबीय घराला कुलूप लावून शेतातील काम करण्यासाठी गेल्याची पाळत राखून दि.२० नोव्हेंबर रोजी गुरूवारी दुपारी बारा ते साडे तीन वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यानी घराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले १लाख ६६ हजार २०० रुपयाचे ३३ ग्राम सोन्याचे व ६५ ग्राम चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना गुरूवारी दिवसा ढवळ्या घडली असून याप्रकरणी संभाजी खाडे यांच्या फिर्यादी वरून केज पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गून्हा नोंद झाला आहे.

केज तालुक्यातील खाडेवाडी येथील संभाजी बन्सी खाडे हे गुरूवारी सकाळी खाजगी कामा निमित्त केजला गेले होते. व त्यांच्या घरातील महिला घराजवळच असलेल्या शेतात काम करण्यासाठी गेले असता, घरी कोणीही नाही ही संधी साधून अज्ञात चोरट्यानी घराचे कुलूप तोडून,कपाटात ठेवलेले सोन्याचे मनी,सोन्याचे पेंडल,सोन्याचे टाप्स, सोन्याची ठुशी,३ सोन्याच्या अंगठ्या मिळून एकूण ३३ ग्राम सोन्याचे जुने वापरते दागिने व चांदीचे चैन जोड व जोडवे मिळून एकूण ६५




ग्राम चांदीचे दागिने मिळून एकूण १ लाख ६६ हजार २०० रुपयाच्यादागिन्याची चोरी करून दागिने लंपास केले आहेत.या प्रकरणी संभाजी बन्सी खाडे यांच्या फिर्यादीवरून शुक्रवारी दुपारीं केज पोलिसात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार राजू वंजारे हे करीत आहेत.

संपादकीय

## नगरपरिषद निवडणुकांनी विदर्भात घुसळण

विदर्भातील ८० नगर परिषदा आणि २० नगरपंचायत यांच्यातील निवडणुका जाहीर होऊन आता काळ पुढे सरकला आहे. निवडणुकांची अधिसूचनाही जाहीर झाली आणि अर्ज दाखल करण्याची तारीखही निघून गेली आहे. आज हे वार्तापत्र लिहीत असताना उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू असून दिवससंपेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेतलेले असतील. त्यानंतर विदर्भातील निवडणुकांचे चित्र स्पष्ट होईल. चांगलीच गती आलेली दिसते आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे त्या-त्या परिसरातील आमदार, पालकमंत्री, खासदार अशा सर्व तत्सम नेत्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागत असते. तशी विदर्भातही लागणार आहे. मात्र खरी कसोटी लागणार आहे ती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाची. काँग्रेसमध्ये महाराष्ट्र स्तरावर नेतृत्व बदल होऊन जेमतेम चार-पाच महिने झाले आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्या रूपाने बुलढाणा जिल्ह्याकडे हे नेतृत्व आले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी या कालखंडात पक्षात नवे चैतन्य फुंकण्याचा प्रयत्न जरूर केला आहे. त्यामुळे आता विदर्भात काँग्रेसला किती यश मिळते त्यावर सपकाळांचे नेतृत्व महाराष्ट्रात कितपत यशस्वी ठरू शकते हे ठरवले जाणार आहे. परिणामी विदर्भातील यशापयश हे काँग्रेसकरिता विशेष महत्त्वाचे राहणार आहे. विदर्भातील आजचे राजकीय चित्र बघता खरी लढत ही भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षांतच होणार आहे हे निश्चित. त्या खालोखाल वंचित बहुजन आघाडी ही बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये आपले थोडेफार का होईना पण अस्तित्व ठेवून आहे. उर्वरित दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस यांना तर आपले अस्तित्व टिकवण्यासाठीच या निवडणुकीत बरीच धडपड करावी लागणार आहे. महाराष्ट्रात आम्ही शक्यतोवर महायुती म्हणून एकत्रच लढू असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत असले तरी विदर्भात देखील कुठेच महायुतीतील तिन्ही घटक पक्ष एकत्र लढताना दिसत नाहीत. त्यातच मोठ्या प्रमाणात बंडखोरी देखील झालेली दिसते आहे. सर्वच पक्षांच्या पक्षश्रेष्ठींचे बंडखोरांना विविध आमिषे दाखवून शांत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आज दिवसाअखेर जितके प्रयत्न यशस्वी होतील तितके बंडखोर खाली बसतील. अन्यथा बहुतेक ठिकाणी बहुरंगी लढती या स्पष्ट दिसत आहेत.पश्चिम विदर्भातील नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीतील राजकारणावर यंदा नातेसंबंधांचा पगडा स्पष्टपणे जाणवतो. विविध पक्षांकडून मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज सादर झालेत. विशेष म्हणजे, या निवडणुकीत कार्यकर्त्यांना संधी देण्याची परंपरा बाजूला सारत अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्या जवळच्या नातेवाइकांनाच थेट रिंगणात उतरवले. अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यांतील २५ नगर परिषदांमध्ये तब्बल दहा ठिकाणी नेत्यांच्या पत्नी, वहिनी, भाऊ आणि सून उमेदवार म्हणून उभे आहेत. बुलढाणा जिल्ह्यात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची वहिनी अपर्णा फुंडकर या नगराध्यक्षपदासाठी रिंगणात उतरल्या आहेत. बुलडाणा नगरपालिकेत शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या पत्नी पूजा उमेदवार आहेत. त्यांच्या विरोधात माजी आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या पत्नी अर्पिता शिंदे रिंगणात उतरल्याने चुरस वाढली. अकोला जिल्ह्यात माजी आमदार नातिकोद्दीन खतीब यांच्या पत्नी रजिया बेगम या वंचित बहुजन आघाडी नगरविकास फ्रंटतर्फे नगराध्यक्षपदासाठी उमेदवार आहेत. अकोटमध्ये माजी राज्यमंत्री रामदास बोडखे यांची सून तसेच माजी नगराध्यक्ष संजय बोडखे यांच्या पत्नी अलका बोडखे यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळाली आहे. मूर्तिजापूर येथे भाजप आमदार हरिष पिंपळे यांचे भाऊ उपेंद्र नगरसेवक पदासाठी उमेदवार आहेत. वाशीममध्ये कारंजा नगर परिषदेत भाजप नेते नरेंद्र गोलेच्छा यांची सून निशा यांना उमेदवारी मिळाली. एमआयएमचे युसूफ पुंजाणी यांच्या आई फरिदाबानू व सून फिज्झा यांनाही उमेदवारी जाहीर झाली. या निवडणुकीत महायुती तसेच महाविकास आघाडीतील विविध पक्षांनी स्थानिक पातळीवर निर्णय सोपवत हात वर केले. यामुळे बुलडाण्यात महायुतीचे घटक पक्षच समोरासमोर आले. शिवसेना विरुद्ध भाजप उमेदवार समोरासमोर लढणार आहेत. उमेदवारी मागे घेतल्यानंतर लढती स्पष्ट होईल. नगरसेवक, अध्यक्ष पदासाठी विविध राजकीय पक्षांकडून कार्यकर्ते, पदाधिकारी स्पर्धेत होते. सर्वांनाच उमेदवारी मिळणे शक्य नसल्याने ऐनवेळी बंडखोरी झालेली आहे. काही जणांनी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली.भाजप हा पार्टी विथ ए डिफरन्स म्हणून ओळखला जात असला तरी या पक्षाची आता जवळजवळ काँग्रेसच होते आहे की काय असे चित्र दिसू लागले आहे. निवडणुकीच्या तोंडावर इथे प्रत्येक जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग झाले आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या सर्वच पक्षातून इलेक्टिव्ह मेरिट असणारे जे जे बंडखोर असतील त्यांना भाजप आपल्याच सामावून घेताना दिसत आहे. त्यामुळे आता भाजपही पार्टी विथ ए डिफरन्स न राहता डिफरंट पार्टी म्हणूनच ओळखली जाईल की काय असे वाटू लागले आहे. तरीही अजूनही भाजपचे अगदी बूथ लेवलपर्यंतचे नेटवर्क भाजपच्या मदतीला येईल हे चित्र या क्षणी तरी दिसते आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक बांधणीच्या नावाने नुसतीच बोंब आहे. प्रत्येक जण स्वतःला नेताच समजतो आहे. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही असे चित्र आहे. नागपुरात सुनील केदार यांच्याविरोधात प्रचंड नाराजी असून मोठ्या प्रमाणात तालुकास्तरावरचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी राजीनामे देऊन बाहेर पडलेत. अशा स्थितीत काँग्रेस आव्हान कसे पेलेल हा प्रश्नच आहे. अर्थात पक्षाच्या नेटवर्कसोबत प्रत्यक्ष उमेदवाराची समाजात असलेली प्रतिमा आणि त्याचा त्या मतदारसंघात असलेला संपर्क हा देखील कामी येईल. त्यामुळे निकाल नेमके काय लागतील हे आज सांगणे कठीण आहे. या निवडणुकीत विदर्भातील सर्वच पक्षाच्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रतापराव जाधव, राज्यातील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पंकज भोयर, अशोक उईके, आकाश फुंडकर, आशीष जयस्वाल, तसेच प्रफुल्ल पटेल, नाना पटोले, सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, कृपाल तुमाने, प्रताप अडसड, रणजीत सावरकर, चैनसुख संचेती, अनिल देशमुख या सर्वांचेच राजकीय अस्तित्व पणाला लागले आहे. अशाही परिस्थितीत आज महाराष्ट्रात आणि केंद्रात भारतीय जनता पक्ष सत्ता स्थानी असल्यामुळे विदर्भात भाजपची हवा चांगली आहे. त्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे ज्येष्ठ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अशोक उईके असे अनेक ज्येष्ठ मंत्री तसेच वरिष्ठ नेते विदर्भातीलच आहेत. त्यामुळे या क्षणी तरी विदर्भात भाजपला वातावरण अनुकूल दिसते आहे. अर्थात ज्या ठिकाणी स्थानिक उमेदवार चांगल्या प्रतिमेचा आणि चांगल्या संपर्काचा असेल त्या ठिकाणी तो कोणत्याही पक्षाचा असला तरी निवडून येण्याची संधी जास्त राहील. असेही असले तरी विदर्भात भाजप निवडून येण्याची शक्यता जास्त दिसते आहे. अर्थात या निवडणुका आहेत. अखेरच्या क्षणापर्यंत हवेचा झोत कसा येईल आणि परिस्थिती कशी बदलेल हे सांगता येत नाही. त्यामुळे निवडणूक निकाल काय लागेल हे चित्र ३ डिसेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

# वित्तीय भांडवलशाही : नवे साम्राज्य, नवा गुलाम



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

आजच्या काळात जगावर राज्य करणारे साम्राज्य शस्त्रांनी नाही, तर 'पैशाने' चालते. हीच आहे वित्तीय भांडवलशाही जिथे भांडवल, म्हणजे पैसा, बाजार आणि बँकिंग यंत्रणा मिळून सत्तेचे खरे केंद्र बनले आहे. पूर्वी साम्राज्ये तोफा, तलवारी आणि सैन्याच्या जोरावर उभी राहत. आज ती संगणकाच्या स्क्रीनवर, शेअर बाजाराच्या चढउतारात आणि बँकांच्या निर्णयांत उभी राहतात. एका क्लिकवर अब्जावधी डॉलर एका देशातून दुसऱ्या देशात हलवले जातात आणि त्या हालचालीवर संपूर्ण राष्ट्रांचे भविष्य अवलंबून असते. ही व्यवस्था कामगार, शेतकरी आणि सामान्य जनतेच्या कष्टावर उभी आहे, पण नफा मात्र काही हातात केंद्रित आहे. कॉर्पोरेट्स, गुंतवणूक बँका आणि वित्तीय संस्थांनी जगाचा नकाशाच बदलून टाकला आहे.

आज बहुतेक देशांचा अर्थसंकल्प, विकासनीती आणि सामाजिक धोरणेही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या अटींवर ठरतात. विकासाच्या नावाखाली देश कर्जाच्या ओझ्याखाली जातात आणि त्यांच्या लोकशाहीवर 'बाजार' अधिराज्य गाजवतो. शेअर बाजारातील घसरण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे भविष्य धोक्यात. चलनवाढ वाढली की गरिबांचा स्वप्नांचा संसार मोडतो, पण काही 'गुंतवणूकदार' मात्र या अस्थिरतेतूनही नफा कमावतात. हीच तर भांडवलशाहीची निर्दयी गणिती पद्धत आहे.

आज वित्तीय साम्राज्य केवळ बँकांपुरते मर्यादित नाही. डिजिटल पेमेंट्स, क्रिप्टोकरन्सी, फिनटेक कंपन्या आणि ई-कॉमर्स यांनी नवीन आर्थिक गुलामी निर्माण केली आहे. डेटा म्हणजेच नवीन सोनं झालं आहे. मोठ्या कंपन्या तुमच्या खरेदीच्या सवयी, आवडीनिवडी आणि स्वप्नांचाही व्यापार करतात. ग्राहक आता ग्राहक राहिला नाही तर तो एक डेटा प्रॉडक्ट बनला आहे. भारतातील आर्थिक सुधारणांनंतर (१९९१ पासून) वित्तीय भांडवलशाहीने आपले पाय खोलवर रोवले. खासगीकरण, परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट अनुदान यांच्या जोरावर संपत्तीची मोजकी केंद्रे तयार झाली. एकीकडे शेअर बाजार तेजीत, तर दुसरीकडे शेतकरी आत्महत्या ही विषमता वित्तीय भांडवलशाहीची सर्वात क्रूर ओळख आहे. राजकीय पक्षांनाही निधी देणारे हेच कॉर्पोरेट घराणे. त्यामुळे लोकशाहीचे निर्णय 'जनतेसाठी' नव्हे तर 'गुंतवणूकदारांसाठी' घेतले जातात. माध्यमांपासून धोरणांपर्यंत सर्वत्र पैशाची छाप दिसते. परिणामतः जनतेचे शासन 'कॉर्पोरेट लोकशाही' बनले आहे. वित्तीय भांडवलशाहीविरोधात संघर्ष म्हणजे फक्त आर्थिक नव्हे तर सांस्कृतिक आणि वैचारिक लढा आहे. स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे, सहकार, शेती, हस्तकला आणि नैतिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, वित्तीय शिक्षण आणि पारदर्शक बँकिंग ही काही प्राथमिक पावले आहेत. परंतु खरी गरज आहे, मानवकेंद्री अर्थव्यवस्थेची. पैसा साधन राहावा, उद्देश नव्हे. आज जगात सर्वात मोठा धोका अणुबॉम्ब नाही, तर पैशाच्या हातात आलेली सत्ता आहे. वित्तीय भांडवलशाहीने माणसाला ग्राहक बनवले, समाजाला बाजार आणि राष्ट्रांना कंपन्यांचे शेअर बनवले. ही साखळी तोडायची असेल, तर विचार बदलावा लागेल माणूस पैशासाठी नव्हे, पैसा माणसासाठी या तत्त्वाकडे परत जावं लागेल.

# पर्यटनातून कोकणच्या अर्थकारणाला गती



कोकण आणि पर्यटन यांचे एक अतूट असे नाते आहे. येथील ऐतिहासिक गड-किल्ले आणि तेवढेच विलोभनीय समुद्रकिनारे यामुळे येथील पर्यटनाला ऊर्जा मिळत आहे. गेल्या १० वर्षांत पर्यटकांची संख्या अद्भुतरीत्या वाढली आहे. एक-दोन लाख पर्यटक जिथे भेट द्यायचे तेथे लाखो पर्यटक हजेरी लावतात. समुद्रकिनारी येणारे ४०० पक्षी, नव्याने सुरू झालेले वॉटर गेम यामुळे येथील पर्यटन वाढू लागले आहेत.कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याला ३० एप्रिल, १९९७ रोजी पर्यटन जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला. या ठिकाणच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून जिल्ह्याचा विकास साधण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती असून तिचा योग पद्धतीने वापर केल्यास जिल्ह्याचा सर्वांगीण आर्थिक विकास होऊ शकतो. याचा विचार करून भारत सरकारने देशातील पहिला सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला आहे. त्या दृष्टीने नवनवीन उद्योग निर्मिती सुरू आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या जिल्ह्यात वाढत आहे. यामध्ये चुलीवरच्या जेवणाला पर्यटकांची जास्त पसंती दिसते. तेव्हा पर्यटन ठिकाणी स्थानिक महिला वर्गाला काम मिळत असल्याने त्या जास्त खुशीत असताना दिसत आहे. तेवढीच संसाराला आर्थिक मदत होत असल्याचे समाधान त्यांना होत आहे. अलीकडे तर पर्यटन ठिकाणी असलेल्या स्थानिक नागरिकांना चांगले आर्थिक दिवस आलेले आहेत. सन २०२२-२३ च्या चालू किमतीनुसार राज्यापेक्षा रुपये ७९१५ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांचे जास्त दरडोई उत्पन्न आहे.सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा झाल्याने आणि १२१ कोलोमीटरची समुद्र किनारपट्टी लाभल्याने जिल्ह्यातील मासेमारी आणि मत्स्य-आहार पर्यटन व्यवसायाला उत्तम प्रकारे चालना मिळत आहे. त्यात सुकी मासळीला सुद्धा बऱ्यापैकी दर येत आहेत. सन २०२३-२४ मध्ये १७९७६ मे. टन मस्त्योत्पादन झाले होते. यातून चांगल्याप्रकारे अर्थप्राप्ती सुद्धा होत असल्याने मत्सव्यवसायिक समाधानी दिसत आहेत. त्याला पावसाळ्यातील पूर परिस्थिती अपवाद आहे. नारळ, सुपाऱ्यांना चांगला दर येत आहे. इतकेच नव्हे तर सुख्या मेव्याला चांगले भाव मिळत आहेत. खडखडे लाडू, मालवणी खाजा आणि खोबऱ्याची गोड वडी भाव खावू लागली आहे. त्यात सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांनी पर्यटकांना विकत घेण्यासाठी आकर्षण केलेले आहे. एक आठवण म्हणून पर्यटक हमखास लाकडी खेळणे खरेदी करतात. त्यामुळे लाकडी खेळण्याला मागणी वाढत आहे. ही खेळणी केवळ देशात नव्हे तर परदेशात सुद्धा प्रसिद्ध आहेत. तसेच विविध हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि गेस्ट हाऊसमध्ये पर्यटक वाढल्याने त्यांच्या उत्पन्नात समाधानकारक वाढ होत असल्याने त्यांच्यापण व्यवसायाला उभारी मिळत आहे. यामध्ये स्थानिक बेरोजगारांना काम मिळत आहे. तसेच कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागाचा विकस होत असल्याचे दिसून येत आहे. यात जिल्ह्यातील स्थानिक कार्यक्रमांना प्रोत्साहन मिळत आहे. आनंदाची बाब म्हणजे पर्यटनामुळे जिल्ह्याच्या महसुलात अधिक वाढ होत आहे. एखाद्या विषयाचा अभ्यास, जीवनात आनंद, एखादा व्यवसाय करणे, विश्रांती घेणे आणि जीवनात मनोरंजन करण्यासाठी एखाद्या ठिकाणी जातो त्याला आपण सर्वसाधारणपणे 'पर्यटन' म्हणतो. कोकण विभागाचा विचार करता देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्याचे नाव घोषित झाल्यानंतर दिवसेंदिवस पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा इतिहास पाहाता पर्यटकांना आकर्षित करणारा जिल्हा आहे. यात निसर्गनिर्मित नैसर्गिक सौंदर्य, स्वच्छ हवा, स्वच्छ समुद्रकिनारे आणि ऐतिहासिक दृष्ट्या विविध किल्ले पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. त्यात अधिक भर पडत आहे ती म्हणजे कोकणातील मालवणी बोलीभाषा होय. त्यामुळे अलीकडच्या काळात गोवा राज्यापेक्षा सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटक अधिक पसंती देत आहेत.काही गावातील वाड्यांमध्ये डांबरी रस्ते नसले तरी महामार्गाचे रुंदीकरण होत आहे. जिल्ह्यात येण्यासाठी रेल्वे सेवा आणि विमान सेवा नियमित नसली तरी अधूनमधून सुरू आहे. लालपरी, खासगी वाहने किंवा स्वत:च्या वाहानाने प्रवास करीत पर्यटक उत्साहाने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या निसर्ग सौंदर्याच्या सान्निध्यात येत असतात. त्यात काही स्थानिक ठिकाणी बैलगाडीतून पर्यटकांना फिरण्याचा आनंद मिळतो. यामुळे या क्षेत्राचा विकास वेगाने होताना दिसत आहे. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. काहींनी आपल्या व्यवसायाचे आकर्षक जाहिराती करून पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. याचा परिणाम त्यांच्या आर्थिक उत्पन्नात समाधानकारक वाढ होताना दिसून येत आहे. त्यांच्या आसपासच्या बेकार युवकांच्या हातांना काम मिळाले आहे हे जिल्ह्याच्या दृष्टीने अतिशय अभिमानाचे आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी कामे चाललेली असली तरी काही ठिकाणी स्थानिक पातळीवर अधिक विकास होणे गरजेचे आहे. तसेच शासकीय अर्थसहाय्य सुद्धा तत्काळ मिळायला हवे. सध्या महिला बचत गटांना सुद्धा चांगले दिवस आलेले दिसून येत आहेत. तेव्हा उत्पादित केलेल्या मालवणी मेव्याला अधिक सुगीचे दिवस येतील त्याप्रमाणे शासन स्तरावर प्रयत्न झाले पाहिजेत. त्यांना शासकीय अनुदान वाढवून दिले गेले पाहिजे. काही उत्पादित केलेला माल आठवडा बाजाराला जाऊन विकला जातो. मात्र इतर वेळेला माल विकण्यासाठी माफक दरात उपलब्ध होणे आवश्यक आहे. यात नाशवंत मालाची विक्री न झाल्यास उत्पादकाला तोटा सहन करावा लागतो. अशा वेळी अनुदानातून मिळणाऱ्या रकमेवर सूट मिळायला हवी. काही वेळा नैसर्गिक आपत्ती आल्यास सूट दिली जाते. ती सूट ताबडतोब जाहीर होऊन नुकसानभरपाई नुकसानग्रस्त धारकांना ताबडतोब त्यांच्या खात्यावर जमा व्हायला हवी. म्हणजे व्यवसायिक पुन्हा आपल्या व्यवसायाला जोमाने सुरुवात करतील. असे केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यात नव्हे तर कोकण विभागातील प्रत्येक जिल्ह्यात झाले तर खऱ्या अर्थाने कोकणाच्या अर्थकारणाला पर्यटनातून गती मिळेल.सागरी पर्यटनाबरोबरच ऐतिहासिक किल्ल्यांवरील पर्यटनालाही बहर आलेला पाहायला मिळतो. कोकणात लहान-मोठे २५० किल्ले आहेत; पण यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेला रायगड, सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, जंजिरा, विजयदुर्ग आणि जागतिक वारसास्थळ म्हणून ज्याची नोंद झाली ते खंदेरी-हुंदेरी अशा किल्ल्यांवरील पर्यटनाला अधिक पसंती मिळत आहे.या पर्यटनवाढीसाठी नव्या पर्यटन धोरणामध्ये कोणत्या धोरणास मंजुरी मिळणार, यावर पर्यटनवाढीचा आलेख अवलंबून असणार आहे. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये गडकिल्ले पर्यटनाला सकारात्मक ऊर्जा देत आहे. हे किल्ले जतन आणि संवर्धन केले, तर इतिहासाच्या या पाऊलखुणा प्रेरक स्वरूपात पर्यटकांसमोर येऊ शकतील. किल्ले रायगडच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्याचा प्रकल्प गेले चार वर्षे प्रलंबित आहे. या शिवसृष्टीच्या प्रकल्पामुळे किल्ले रायगडला नवी ओळख मिळू शकणार आहे. कोकणातील जत्रोत्सव हेसुद्धा पर्यटकांचे केंद्रबिंदू आहे. आंगणेवाडीची भराडीदेवी जत्रोत्सव, कुणकेश्वर जत्रोत्सव, रत्नागिरीतील मार्लेश्वर, रायगडमधील विठोबा आणि दत्ताची जत्रा या जत्रोत्सवासाठी लाखो भाविक येत असतात. त्यामुळे या पुरातन मंदिरांचा विकास नक्कीच पर्यटनाला ऊर्जा देईल.

# राष्ट्रपतींच्या हस्ते सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचे वितरण; महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' पुरस्कार

दैनिक वादळ वार्ता
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**




केंद्रीय जलशक्ती मंत्रालयामार्फत जलव्यवस्थापन आणि संवर्धन क्षेत्रातील कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये (२०२४) महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्याचा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्याच्यावतीने तो स्वीकारला. तसेच उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महापालिकेने प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात आज झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार - २०२४ प्रदान करण्यात आले. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, जलशक्ती राज्यमंत्री राजभूषण चौधरी, राज्यमंत्री व्ही. सोमन्ना, विभागीय सचिव व्ही. एल. कांथाराव व विभागाचे सचिव अशोक, के. के. मीना यावेळी उपस्थित होते. श्री. विखे पाटील यांच्यासोबत राज्याच्या जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दिपक कपूर उपस्थित होते. या मानांकन स्पर्धेत गुजरातला दुसरा तर हरियाणाला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राष्ट्रपतींकडून विजेत्यांचे अभिनंदन

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, आपल्या भाषणात, अमृता इतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचं कौतुक केले. भारतीय परंपरेमधे जलस्रोतांना पूजनीय मानले गेले आहे. माणूस अन्नाशिवाय काही काळ जगू शकेल, मात्र पाण्याशिवाय जगू शकत नाही, त्यामुळे पाण्याच्या संवर्धनासाठी काम करणारे कौतुकास पात्र आहेत, असे यावेळी राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्यावर्षी सुरू झालेल्या जलसंवर्धन जनसहभाग उपक्रमाद्वारे ३५ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचना उभारल्या गेल्या असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितले. देशात मर्यादित जलस्रोत असल्याने त्याचा वापर जपून करायला हवा आहे. हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून जलस्रोतांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावं असं आवाहन त्यांनी यावेळी केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र सदन येथे माध्यमांशी बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' म्हणून सन्मान प्राप्त होणे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. राज्य सरकारने राबवलेल्या अभिनव जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसेच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे.बंद नलिका वितरण प्रणाली, उपसा सिंचन प्रकल्पांचे आधुनिकीकरण, नदी जोड प्रकल्प, पम्पिंग स्टोरेज योजना, जलाशयांवर फ्लोटिंग सौर प्रकल्प आणि सांडपाणी शुद्धीकरण-पुनर्वापर या सहा अभिनव संकल्पनांमुळे महाराष्ट्राला हे यश मिळाल्याचे विखे पाटील यांनी नमूद केले.महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.या प्रमुख यशासोबतच महाराष्ट्रातील इतर दोन संस्थांनाही महत्त्वाच्या श्रेणींमध्ये पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या गटात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावला. हा पुरस्कार आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वीकारला. सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था नाशिक जिल्ह्यातील कनिफनाथ जल/पाणी वापर सहकारी संस्थेला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष आणि इतर पदाधिकारी यांनी स्वीकारला.

# शेतातील संशयास्पद मृत्यूचा गुन्हा उघड! पंच्याहत्तर वर्षीय महिलेला गळा दाबून खून; भाचा पोलिसांच्या ताब्यात

## पोलीस तपासात ‘स्ट्रॅन्ग्युलेशन’ची खात्री; मोबाईल लोकेशनवरून आरोपी पुण्यातून अटक–५ दिवस पीसीआर मागणी

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील ढगे पिंपळगाव शिवारात वृद्ध महिलेला गळा दाबून खून केल्याप्रकरणी लोहा पोलिसांनी त्यांच्या भाच्याला अटक केली असून, या गंभीर गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयात ५ दिवस पोलीस कस्टडी रिमांड (झउठ) मागितली आहे.

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय लोहा यांचेकडे सहाय्यक पोलीस निरीक्षक नौशाद पठाण यांनी रिमांड रिपोर्ट सादर केला आहे.

**घटना कशी उघड झाली?**

फिर्यादी सत्यभामा गोपाळराव बगाडे (रा. डोंगरगाव) यांनी दिलेल्या माहितीवरून दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी ढगे पिंपळगाव येथील शेतात त्यांची आई अहिल्याबाई मसाजी ढगे (वय ७५) मृत अवस्थेत आढळली. सुरुवातीला हा नैसर्गिक मृत्यू समजून अंत्यविधी करण्यात आला; मात्र पोस्टमार्टम अहवालात मृत्यूचे कारण डीीरपर्सीश्रींळेप (गळा दाबून ठार मारणे) असे स्पष्ट होताच परिस्थिती बदलली.



**शेतीच्या वादातून खूनाची शक्यता**

फिर्यादींच्या मते, मयत महिलेचा भाचा गणेश नारायण ढगे (वय २४) याच्यासोबत शेतीसंबंधी सातत्याने वाद होत होते.

चार महिन्यांपूर्वी आरोपीने मयताच्या तोंडावर उशी ठेवून दाबण्याचा प्रयत्न केल्याचीही नोंद आहे.

पोस्टमार्टम अहवाल मिळताच पोलिसांनी गुन्हा गुरनं. ३४४/२०२५, कलम १०३(१) इछड नुसार नोंदवून तपास वेगाने सुरू केला.

**मोबाईल लोकेशनने उलगडा – पुण्यातून आरोपी जेरबंद**

तपासादरम्यान आरोपीचे मोबाईल लोकेशन नाशिक, पुणे, सोलापूर या ठिकाणी आढळले.

मा. पोलीस अधीक्षक यांच्या परवानगीने शोधपथक पुण्यात पोहोचले. अखेरीस पुण्यात आरोपी गणेश ढगे सापडला.

लोहा पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी न्यायालयात नमूद केले आहे.

अटक प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे पूर्ण करण्यात आली.

**तपासात समोर आलेली महत्त्वाची तथ्ये**

घटनास्थळी दाताची कवळी, माती, रक्तमिश्रित नमुने, चप्पल इत्यादी मुद्देमाल जप्त.

डॉग स्क्वॉड, फिंगर प्रिंट, फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने पंचनामा. पी.एम. रिपोर्टनुसार मृत्यूचे कारण गळा दाबून ठार मारणे निश्चित.

आरोपी व त्याच्या नातेवाईकांचे मोबाईल CDR तपासले.

घटनास्थळाचा डंप डेटा, सोशल मीडिया अकाउंट, इंस्टाग्राम तपासले.

कलम १८३ B.N.S.S. अंतर्गत महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंद.

**५ दिवस पीसीआर का आवश्यक? – पोलिसांचे कारणपत्र**

पोलीसांनी न्यायालयात नमूद केलेली प्रमुख कारणे खूनाचा नेमका हेतू व कारण शोधणे बाकी.

गळा दाबण्यासाठी वापरलेले हत्यार/साहित्य शोधणे.

आरोपीला सहाय्य करणारे अन्य साथीदार आहेत का, हे तपासणे. मयताचे गायब झालेल्या दागिन्यांबद्दल तपास आवश्यक. गुन्ह्याचा संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट करण्यासाठी आरोपीची सखोल चौकशी गरजेची. अटक झाल्यानंतर आरोपीने तपासात सहकार्य केलेले नाही. पुढील तपास करण्यासाठी आरोपीला पोलीस कस्टडी रिमांड देण्यात यावी, अशी विनंती न्यायालयास करण्यात आली आहे.

# राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेतील खेळाडूंचे नेत्रदीपक यश



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेतील खेळाडूंनी दि.१३ ते १५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान शिर्डी या ठिकाणी पार पडलेल्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.या स्पर्धेमध्ये तांदळे अक्षदा अमर हिने राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत सर्वतृतीय येण्याचा बहुमान मिळवला.तिला ब्रॉन्झ मेडल व प्रशस्तीपत्र मिळाले.तसेच हावळे मैथिली कैलास हिने राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेतील सहभागी प्रमाणपत्र मिळाले.

वरील यशस्वी खेळाडूंचा तसेच तायक्वांदो स्पर्धेचे प्रशिक्षक तथा मार्गदर्शक बन्सी राऊत यांचा जीवन विकास शिक्षण मंडळ केज संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,शाळेतील क्रीडाशिक्षक श्रीकिशन नेहरकर या सर्वांच्या उपस्थितीत पालकांसह सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.

# दिव्यांगांना युडीआयडी ओळखपत्र देण्यासाठी

## तालुकानिहाय शिबिरांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता | **चंद्रपूर | प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगांचे एकुण २१ प्रकार आहेत. केंद्र शासनाच्या धर्तीवर दिव्यांगत्वासंदर्भातील सर्व लाभ मिळविण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (Unique Disability Identity Card-UDID Card) बंधनकारक करण्यात आले आहे. वैश्विक ओळखपत्र असल्याशिवाय दिव्यांगांना कोणताही लाभ देता येणार नाही. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील ज्या दिव्यांग लाभार्थ्यांकडे (युडीआयडी) वैश्विक ओळखपत्र नाही, अशा लाभार्थ्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून तालुकानिहाय सुध्दा शिबीर घेण्यात येणार आहे. असे आहे तालुकानिहाय वेळापत्रक : पंचायत समिती कोरपना / जिवती येथे ३ डिसेंबर रोजी, पंचायत समिती ब्रम्हपुरी /चिमुर येथे ४ डिसेंबर रोजी, पंचायत समिती मुल /पोभुर्णा येथे १० डिसेंबर रोजी, पंचायत समिती भद्रावती/ गोंडपिपरी/ राजुरा येथे ११ डिसेंबर रोजी, पंचायत समिती सिंदेवाही / नागभिड येथे १७ डिसेंबर रोजी आणि पंचायत समिती सावली येथे १८ डिसेंबर २०२५ रोजी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.याशिवाय सर्व तालुक्यातील शिल्लक दिव्यांग लाभार्थ्यांकरीता २४ डिसेंबर, २६ डिसेंबर आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी शिबीर प्रस्तावित आहे. वरील वेळापत्रकाप्रमाणे शिबीर घेऊन दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र/वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी) बाबत शासनाचे दिनांक २५ जुन २०१८ नुसार नगरपालिका, नगरपंचायत, पंचायत समिती/ ग्रामपंचायत च्या ५ टक्के निधीतुन दिव्यांग लाभार्थ्यांना ने–आण करण्याची जबाबदारी राहील. सदर शिबिरापासून कोणताही लाभार्थी वंचित राहु नये, याबाबत दक्षता घेण्यात यावी, असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी धंनजय साळवे यांनी कळविले आहे.

# बोबडेवाडी येथील युवक ज्ञानेश्वर आदमाने यांची भारतीय सैन्य दलात भरती झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथील ज्ञानेश्वर भाऊसाहेब आदमाने याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याने पंचायत समिती सदस्य शिवाजी ऊर्फ बंडू चौधरी व ग्रामस्थांनी कुटुंबाचा हृदय सत्कार केला.याप्रसंगी भैरू दामोदर चौधरी सर पैठण माजी चेअरमन,उपसरपंच बाबासाहेब बोबडे,माजी सरपंच निरंजन बोबडे, माजी सरपंच नवनाथ क्षीरसागर दिपक कोटुळे, मोहनराव बोबडे,गांजी गावचे माजी उपसरपंच सतीष जाधव,संजय बोबडे,भैया जाधव व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.या वेळी बोलताना ज्ञानेश्वर आदमाने यांनी देशाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे याचा आपल्याला सार्थ अभिमान असुन बोबडेवाडी गावाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# जिवाचे रान करा, रक्ताचे पाणी करा आणि संदेश पारकर यांना नगराध्यक्ष करा


## ठाकरेंच्या उमेदवारांसाठी चक्क नीलेश राणे यांचा एल्गार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट आणि भाजपा यांची महायुती झालेली नाही. तर शिवसेना नेते नीलेश राणे यांनी कणकवली शहर विकास आघाडीला पाठिंबा दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी असलेले माजी नगराध्यक्ष संदेश पारकर हे कणकवली शहर विकास आघाडीकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार नीलेश राणे हे ठाकरे गटाच्या उमेदवारांसाठी मैदानात उतरल्याचे पाहायला मिळत आहे. उध्दव ठाकरे आणि राणे पिता पुत्रांचे राजकीय वैर सर्वश्रुत आहे. तरीही शिंदे सेनेचे आमदार नीलेश राणे यांनी जीवाचं रान करु, रक्ताचे पाणी करू, काय वाटेल ते झालं तरी चालेल, पण या कणकवली शहर विकास आघाडीला नगराध्यक्षपदाचे उमेदवार शिवसेना ठाकरे गटाचे संदेश पारकर आणि नगरसेवकांना निवडून आणू, असा एल्गार व्यक्त केला आहे. संदे पारकर व कणकवली शहर विकास आघाडीच्या नगरसेवकांसाठी झालेल्या सभेत शिंदेंची शिवसेना आणि ठाकरेंची शिवसेना अशा दोन्ही पक्षांचे पदाधिकारी एकत्र आले होते. नीलेश राणे यांनी कणकवली येथे बुधवारी रात्री उशिरा झालेल्या जाहीर सभेत केलेले भाषण चर्चेचा विषय ठरले आहे. संदेश पारकर यांच्या रुपाने सिंधुदुर्गच जिंकणार, समोर कोण आहे याचा विचार करू नका, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करत निलेश राणे आता थेट रणांगणात उतरले आहेत. यावेळी व्यासपीठावर सतीश सावंत, माजी आमदार राजन तेली, नगराध्यक्षपदाचे उमेदवार संदेश पारकर आदी उपस्थित होते.





# मुंबई पुनर्विकासाला गती; ६०० चौरस फुटांपर्यंत नोंदणी फी माफ

## राज्य सरकारचा मोठा निर्णय, भाडेकरूंना नोंदणी फीपासून पूर्ण सवलत

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबईतील पुनर्विकास प्रक्रियेतील भाडेकरूंना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासादरम्यान नवीन इमारतीत जागा मिळणाऱ्या भाडेकरूंना आता नोंदणी फीपासून पूर्ण सवलत देण्यात येणार आहे. आतापर्यंत ४०० चौरस फुटापर्यंत ही सवलत लागू होती. मात्र यामध्ये मोठा बदल करत सरकारने मर्यादा थेट ६०० चौरस फुटांपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे नागरिकांना आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होणार असून पुनर्विकास प्रक्रिया अधिक गतीने होण्याची शक्यता आहे.नवीन धोरणानुसार भाडेकरूला मिळणाऱ्या घराचे क्षेत्रफळ २०० चौरस फुटांनी वाढले तरीही नोंदणी फी आकारली जाणार नाही. अनेक वर्षांपासून जुन्या, जर्जर इमारतींमध्ये राहणाऱ्या भाडेकरूंना पुनर्विकासाच्या प्रक्रियेमध्ये नोंदणी शुल्काचा मोठा बोजा पडत होता. या शुल्कामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक अडचण वाढत होती. त्यामुळे ही फी माफ करण्याचा निर्णय हा सामान्य नागरिकांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. राज्य सरकारने पुनर्विकास प्रक्रियेतील अडथळे कमी करण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून विविध पातळीवर प्रयत्न केले असून ही सवलत त्याच धोरणाचा पुढील टप्पा मानला जात आहे.महसूल विभागाने या संदर्भात एक परिपत्रक जारी केले असून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना विशिष्ट मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या पत्रात म्हटले आहे की मार्गदर्शक सुचना २(अ) आणि २(ब) मधील बदल केवळ क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्पांना लागू असतील. त्यामुळे व्यक्तिगत पुनर्विकास किंवा छोट्या प्रकल्पांमध्ये ही तरतूद लागू होणार नाही. शिवाय या सवलतीमुळे सन २०२५–२६ साठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक मूल्यदर तक्त्यात कोणतीही वाढ किंवा घट होणार नाही, याची काटेकोर खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. म्हणजेच सध्याच्या आर्थिक वर्षातील कर रचनेत कोणताही बदल होऊ नये, यावर सरकारने स्पष्ट भर दिला आहे.याशिवाय महसूल विभागाने हेही सूचित केले आहे की, जर प्रस्तावित बदलांमुळे वार्षिक मूल्यदर तक्त्यात वाढ किंवा घट होण्याची शक्यता निर्माण झाली, तर ती बदल १ एप्रिल २०२६ पूर्वी अंमलात येऊ नयेत. यामुळे सरकारने नियमात तातडीचा बदल न करता नागरिकांवर किंवा महापालिकेच्या कर व्यवस्थेवर परिणाम होणार नाही याची खात्री केली आहे. पुनर्विकासाशी संबंधित नोंदणी प्रक्रिया स्पष्ट व पारदर्शक करण्यासाठी राज्य शासनाने घेतलेले हे पाऊल प्रशासनिकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. महसूल विभागाचे अधिकारी, नियोजन विभाग आणि पुनर्विकासातील संबंधित संस्था या सर्वांना या सूचनांचे पालन करावे लागणार आहे.

# धानिवरी कोटबीपाडा येथे भव्य रॅकोट डान्स स्पर्धा ५६ स्पर्धकांचा सहभाग आणि हजारोंची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**पालघर | प्रतिनिधी**

गृप ग्रामपंचायत धानिवरी अंतर्गत, दिनांक १७ नोव्हेंबर रोजी धानिवरी कोटबीपाडा येथे कणसरी गृप कला व क्रीडा मंडळ धानिवरी आणि आदिवासी युवा परिवर्तन गृप धानिवरी यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या भव्य रॅकोट डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत तब्बल ५६ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

अंबरनाथ, कल्याण, नाशिक, सफाळा, बोईसर, विरार तसेच गुजरात राज्यातून आलेल्या स्पर्धकांनी सादर केलेल्या विविध नृत्यप्रकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले ज्युनियर आर्टिस्ट सलमान खान यांचे नृत्य सादरीकरण. त्यांच्या जोशपूर्ण आणि प्रभावी नृत्याला प्रेक्षकांनी टाळ्यांचा वर्षाव करत भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमाला १२ ते १५ हजार प्रेक्षकांची उपस्थिती लाभली होती. संपूर्ण परिसरात उत्साह, आनंद आणि सांस्कृतिक रंगत दाटून आली होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबईहून आगमन केलेले उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते व माजी खासदार विनायक राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेते व माजी आमदार सुनिल भुसारा, शिवसेना जिल्हाध्यक्ष विनायक राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य जयेंद्र दुबळा, कष्टकरी संघटनेच्या मधुबाई थोड़ी, MPSC उत्तीर्ण प्रियंका म्हसकर, कासा उपनिरीक्षक किशोर पवार, दिपक बोंबा तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

स्थानिक लोकप्रतिनिधींमध्ये धानिवरी सरपंच शैलेश कोरडा, दहेळा सरपंच सुनिल भाईर, असरविरा उपसरपंच जिवन परहाड, मुरबाळ सरपंच रविंद्र बेन्दर, सेणसरी सरपंच साधना बोरसा, सायवन सरपंच विष्णू बोरसा यांची उपस्थिती होती. तसेच राजू दळवी, महेंद्र कोब, कैलास सुतार, रघु सुतार, गनेश पडवले, प्रकाश बाहोटा, अंकुश गोरवाला, सुनिल तांबडा, रामदास गोरवाला, अशोक गोरवाला, नितीन तल्हा, अशोक परहाड, रामदास शनवार, प्रविण दळवी आदी प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. यूट्यूब क्षेत्रातील अनेक लोकप्रिय कलाकारांनीही कार्यक्रमाला हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.




स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत राज भारत्वा यांनी १३.३३३ गुण मिळवत प्रथम पारितोषिक पटकावले, तर ८.५५५ गुणांसह विपुल भेस्कर यांनी द्वितीय पारितोषिक जिंकले. ५.५५५ गुण मिळवत M.K.D.C.L. गट, बोईसर यांनी तृतीय पारितोषिक पटकावले. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्साहवर्धक सूत्रसंचालन संजु बोबा यांनी केले. उत्कृष्ट नियोजन, प्रचंड प्रेक्षक प्रतिसाद आणि स्पर्धकांचा भव्य सहभाग यामुळे ही रॅकोट डान्स स्पर्धा धानिवरी परिसरातील सर्वात यशस्वी आणि अविस्मरणीय सांस्कृतिक सोहळा ठरला.

# हजरत टिपू सुलतान यांची जयंती साजरी करणे ही सर्व धर्मीयांची जबाबदारी-प्रा.डॉ.सिद्धार्थ शिनगारे


## क्रांती नगर येथे टीपू सुल्तान यांची जयंती उत्साहात साजरी,अनेक मान्यवरांची उपस्थिती ठरले आकर्षण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथे २० नोव्हेंबर रोजी शेर ए मैसूर, शेर ए हिंदुस्तान म्हणून ज्यांची जगभर ख्याती आहे, असे हजरत टिपू सुलतान यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी क्रांती नगर भागातील प्रचंड मोठा जनसमुदाय उपस्थित होता. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विधवा महिलांना स्वेटर व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत, वैचारिक ठेवा जपत यावेळी आगळीवेगळी जयंती साजरी करण्यात आली. जयंतीचे अध्यक्ष इरफान पठाण यांनी व त्यांच्या संपूर्ण टीम ने जयंती साजरी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. यावेळी केजच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सीताताई बनसोड या उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे क्रांती नगरचे तत्पर नगरसेवक अजहर भाई इनामदार उपस्थित होते यावेळी बोलताना सीताताई बनसोड म्हणाल्या, कि या जयंतीचे वेगळेपण म्हणजे डी.जे. मिरवणूक न काढता सामाजिक भान ठेवून गरजूंना मदत करून ही जयंती साजरी होत आहे. याबद्दल येथील नियोजन कमिटीचे विशेष कौतुक!.





या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेले व्याख्याते मा.प्राध्यापक डॉ.सिद्धार्थ शिनगारे हे होते. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी हजरत टिपू सुलतान यांच्या विषयी विस्तृत अशी माहिती सांगताना म्हणाले, कि टिपू सुलतान यांची जयंती साजरी करणे ही सर्व धर्मीयांची जबाबदारी आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की हजरत टिपू सुलतान हे या भारत भूमीचे भूमिपुत्र आहेत. ते बाहेरून आलेले नाहीत. मुस्लिम समाज सर्वधर्म समभाव पळतात. मशिदीमध्ये सर्वांना प्रवेश दिला जातोय. त्यावेळेस दलित स्त्रियांना हीनतेची वागणूक दिली जायची, परंतु हैदरअली म्हणजेच हजरत टिपू सुलतान यांचे वडील यांनी कोणालाही अर्धनग्न राहण्याची बळजबरी करू नये असा नियम काढून स्त्रियांचा आदर केला.

अछुत, अस्पृशतेला त्यांनी आपल्या राज्यामध्ये कधी थारा दिला नाही. शेतीमध्ये अनेक सुधार करण्याचे कार्य हजरत टिपू सुलतान यांच्या राज्यामध्ये झालेले पाहायला मिळते. भारतामध्ये युद्धामध्ये टेक्नॉलॉजीचा वापर उत्तम प्रकारे केला जाऊ शकतो, याचा प्रत्यय हजरत टिपू सुलतान यांनी करून दिलेला आहे. टिपू सुलतान यांच्याकडे दोन हजार पुस्तके होती. यावरून ते किती गाढे अभ्यासक होते हे लक्षात येईल.

सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हरुण भाई इनामदार (राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट) हे देखील उपस्थित होते. आझाद क्रांती सेनेचे सेनानायक मा.राजेश भाऊ घोडे हे देखील या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. ज्येष्ठ मार्गदर्शक बाबुराव गालफाडे साहेब, आझाद क्रांती सेनेचे केज तालुकाध्यक्ष शरद थोरात, आझाद क्रांती सेनेचे उपशहर प्रमुख अनिल लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते लखन हजारे, शितलताई लांडगे (राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट महिला तालुकाध्यक्ष), सामाजिक कार्यकर्ते रोहित कसबे, सामाजिक कार्यकर्ते योगेश गायकवाड, दलित महासंघाचे तालुकाध्यक्ष विनायकरावजी लोंढे,शिनगारे सर ,इसाक तांबोळी,अहमद पठाण, खय्युम तांबोळी,दिपक पवार, अजिंक्य माने, अजय गालफाडे, प्रेम गायकवाड,कैफ पठाण, इम्रान तांबोळी,त्याचप्रमाणे पत्रकार पांडुरंग कसबे, हजरत टिपू सुलतान जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष इरफान पठाण (आझाद क्रांती सेना शहरप्रमुख), उपाध्यक्ष अमन पठाण, सचिव साहिल तांबोळी, कोषाध्यक्ष वाहेद तांबोळी, व सुलतान कंपनीचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.

# शहरातील नागरिक वत्सला खांडेकर यांचे दुखःद निधन

दैनिक वादळ वाता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील जेष्ठ महिला वत्सला इंदाकर राव खांडेकर वय ६० वर्ष यांचे गुरुवारी सायंकाळी अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले आहे.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार रोजी सकाळी सोनिजवळा रोड येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले मुली जावाई, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्या सेवानिवृत्त कर्मचारी इंदाकरराव खांडेकर यांच्या पत्नी होत व वैभव खांडेकर यांच्या आई होत.



# मालेगाव घटनेचा केज येथे निषेध,आरोपीला कठोर शासन करण्याची सुवर्णकार व के.वि.सं.स ची मागणी

दैनिक वादळ वाता

**केज । प्रतिनिधी**

मालेगाव नजीक डोंगराळे येथील साडेतीन वर्षाची चिमुकली यज्ञा जगदीश दुसाने हिच्यावर अत्याचार करून तिची निर्दयपणे क्रूर हत्या करणाऱ्या नराधमाला तात्काळ फाशी द्या अशी मागणी करत येथील केज तालुका सुवर्णकार संघटना व केज विकास संघर्ष समितीच्या वतीने केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात पुढे म्हटले आहे की,अलीकडील काळात दहा वर्षाखालील चिमुकल्या मुलीवर अत्याचाराचे व हत्येचे प्रमाण खूप वाढले आहे. गुन्हेगारांवर कसलाच वचक राहिलेला नाही. राज्य व केंद्र सरकारने जनतेच्या भावना व मागणी लक्षात घेऊन अशा विशिष्ठ संवेदनशील प्रकरणात विशेष कायदा करून आठ दिवसाच्या आत दिवसरात्र तपास व चौकशी करून दोषी असल्यास गुन्हेगाराला आठव्या दिवशी फाशी देण्यात यावी असे झाले तरच अशा प्रकारच्या घटना थांबतील व जनतेचा कायद्यावरील विश्वास कायम राहील. मात्र असे न होता अशा गुन्ह्याचा तपास व न्यायिक प्रक्रिया वर्षानुवर्षे चालत राहते. त्यामुळे अशा घटना पुन्हा पुन्हा घडत आहेत.आता लोकांचा संयम तुटू लागल्याने व कायद्या वरील विश्वास उडत चालल्याने लोक आता कायदा हातात घेऊन पोलिसांचे कडे तोडून न्यायालयात परिसरात घुसू लागले आहेत जे मालेगाव येथे घडले. आता शासनाने जनतेच्या संयमाची वाट न पाहता तात्काळ अशा प्रकरणा तील आरोपीला आठ दिवसात फाशीदेण्यासाठी कायदा व प्रक्रिया बदलावी अशी मागणी केज वासियांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केली आहे.यावेळी केज तालुका सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष गोविंद कणसे, माजी अध्यक्ष मोहनराव धपाटे,केज विकास संघर्ष समितीचे नासेर मुंडे यांच्या सह सराफा संघटनेचे पदाधिकारी प्रवीण भोसले,लखन वाकळे,मधुकर निंगुळे, सचिव प्रकाश कामाजी, सचिन वेदपाठक,संदीप नाईकनवरे,युवराज बुदगुडे,राजेंद्र पंडित, विकास तरकसबंद,संजय रोडे,संतोष नेमटे, मफिजूल इस्लाम,दत्ता दीक्षित,शफिफुल शेख, मनोज कदम,संकेत धस यांच्यासह इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा गांधी विद्यालय, काटेगाव प्रशालेत हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बार्शी । प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यालय, काटेगाव प्रशालेत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांच्या विविध शाखांमधील १४ व १७ वर्षे वयोगटातील मुला-मुलींची हॉलीबॉल स्पर्धा दिमाखात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन काटेगावचे सरपंच श्री चंद्रसेन गवळी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून पी. टी. पाटील (जनरल सेक्रेटरी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी)उपस्थित होते.

प्रमुख मान्यवरांमध्ये किरण गाढवे,श्री राजेश माळी, अमिन गोरे,निलेश गाढवे, विलास माळी, उमेश शेलार, फैयाज नाईकवाडी,तसेच प्रशालेच्या माजी मुख्याध्यापिका गाढवे यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

उद्घाटन प्रसंगी पी. टी. पाटील यांनी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सर्व गटांमध्ये उत्कृष्ट कौशल्य दाखवत स्पर्धेला ऊर्जा व उत्साहाची पराकाष्ठा दिली.

स्पर्धेतील निकाल

**१४ वर्षे वयोगट – मुली**

* प्रथम : महाराष्ट्र विद्यालय, बार्शी
* द्वितीय : कर्मवीर विद्यालय, चारे
* तृतीय : महात्मा गांधी विद्यालय, काटेगाव

**१४ वर्षे वयोगट – मुले**

* प्रथम : महाराष्ट्र विद्यालय, बार्शी
* द्वितीय : महात्मा गांधी विद्यालय, काटेगाव
* तृतीय : कर्मवीर विद्यालय, चारे

**१७ वर्षे वयोगट – मुली**



* प्रथम : महाराष्ट्र विद्यालय, बार्शी
* द्वितीय : कर्मवीर विद्यालय, चारे
* तृतीय : जनता विद्यालय, येडशी

**१७ वर्षे वयोगट – मुले**

* प्रथम : महाराष्ट्र विद्यालय, बार्शी
* द्वितीय : महात्मा गांधी विद्यालय, काटेगाव
* तृतीय : कर्मवीर विद्यालय, चारे

बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष देबडवाड (जॉईंट सेक्रेटरी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी)हे होते. पाहुणे म्हणून व्ही. एस. पाटील ( माजी जनरल सेक्रेटरी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी), भालके , सी. एस. मोरे उपस्थित होते.

बक्षीस वितरण प्रसंगी देबडवाड यांनी मनोगत व्यक्त केले व विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अनिल पाटील यांनी केले. सूत्रसंचालन आनंद खुने यांनी केले तर आभार प्रदर्शन रवी मोरे यांनी केले.

स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मनापासून परिश्रम घेतले.

# आदर्श विद्यालय बनसारोळा येथे संविधान दिनानिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

दैनिक वादळ वाता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात संविधान दिनाचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग मिळाला असून निवड झालेल्या विजेत्यांचा दि.२१नोव्हेंबर रोजी झालेल्या समारंभात गौरव करण्यात आला.

बक्षीस वितरण सोहळा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.चव्हाण मॅडम तसेच साळुंखे सर व अंबाडसर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करण्यात आली.

मोठा गट-विजेते प्रथम पारितोषिक -अक्षरा अमोल गोरे,द्वितीय पारितोषिक -प्राची महादेव पौळ,लहान गट विजेते प्रथम पारितोषिक मयुरी



नंदकिशोर लुगडे, द्वितीय पारितोषिक - विश्वजीत बाळासाहेब सोनके या स्पर्धेसाठीची बक्षिसे शाळेचे सहशिक्षक लोखंडे सर आणि कापसे सर यांनी प्रेमपूर्वक उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; कापसात लावलेला ६८ किलो गांजा जप्त

## गुप्त माहितीच्या आधारे रायवाडी शिवारात छापा; आरोपी शेतकरी ताब्यात-जप्त मालाची किंमत तब्बल ६.८३ लाख

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या 'ऑपरेशन फ्लश आउट' मोहिमेअंतर्गत अवैध धंद्यांवर लगाम घालण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईचा एक भाग म्हणून स्थानिक गुन्हे शाखा नांदेडने लोहा तालुक्यातील रायवाडी शिवारात मोठी धडक कारवाई करत तब्बल ६८ किलो ३४० ग्रॅम गांजा जप्त केला. जप्त मालाची बाजारातील अंदाजे किंमत ६,८३,४००/- असून आरोपी शेतकऱ्याविरुद्ध छऊझड कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक मा. श्रीमती अर्चना पाटील (भोकर) व मा. श्री सुरज गुरव (नांदेड) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

गोपनीय माहिती आणि तत्काळ धाड दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की नामदेव माणीका मोरे (वय ६०, रा. रायवाडी, ता. लोहा) यांनी आपल्या कापसाच्या शेतात गांजाची बेकायदेशीर शेती केली आहे. तसेच गांजाच्या झाडांच्या फांद्या कापून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलीस पथकाने तत्काळ छापा टाकला.छाप्यात शेतात ५० ते ६० गांजाच्या फांद्या कापून ठेवलेल्या अवस्थेत आढळून आल्या. पंचासमक्ष सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोहेकॉ विठ्ठल शेळके, सुनिलदत्त गटलेवार, दिलीपकुमार चंचलवाड पोकॉ माधव माने, संघरत्न गायकवाड, श्रीराम दासरे, उमर शेख, धम्मा जाधव चालक सुधाकर देवकत्ते, भिमराव लोणे उपस्थित होते. या यशस्वी कारवाईबद्दल मा. पोलीस अधीक्षक श्री. अबिनाश कुमार यांनी पथकातील सर्व अधिकारी व अंमलदारांचे विशेष कौतुक केले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077